**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे ४११ ००१

श्री. अरुण रामचंद्र पवार
मु.पो.कसबे डिग्रज, वॉर्ड नं. १,
ता.मिरज, जिल्हा सांगली

..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** शिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद कोल्हापूर

..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
उपशिक्षणाधिकारी (माध्य.),
जिल्हा परिषद कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११२/२०१० सांगली |
| २ | प्रथम अपिलाची तारीख | १/६/२०९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत अपीलासोबत जोडलेली नसल्याने आवश्यक असणाऱ्या माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अरुण रामचंद्र पवार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

# आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

स्थळ : पुणे
दि. ३०-०९-२०१०.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. चंद्रशेखर श्रीपाद गाडेकर — अपीलकर्ता
२६६७-क, देशपांडे गल्ली, ए वॉर्ड,
शिवाजी रोड, कोल्हापूर-४१६ ०१२

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शहर उप अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका,कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ६.२.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** — श्री. चंद्रशेखर श्रीपाद गाडेकर
२६६७-क. देशपांडे गल्ली, ए वॉर्ड.
शिवाजी रोड, कोल्हापूर-४१६ ०१२

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,कोल्हापूर
श्री. जी. एन. देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा — शहर उप अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका,
कोल्हापूर श्री. एन.एस.सरनोबत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.१२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## <u>विवेचन</u>

सर्व भूखंड धारकांची परवानगी न घेता सादर केलेल्या बांधकाम आराखड्याला अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली. संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाईच्या आपल्या मागणीनुसार कारवाई केली नाही. सात दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी देऊनही जन माहिती अधिकारी तथा शहर उप अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी माहिती दिली नाही,असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. चंद्रशेखर श्रीपाद गाडेकर यांनी केले.

बांधकाम आराखडा सादर केल्यानुसार परवानगी देण्यात आली. तक्रारीनंतर सुधारित परवानगी दिली आहे. माहितीबाबत शुल्क कळविले होते. तसेच नस्ती पाहण्यासाठी दिली. परंतु कागदपत्रे नको असल्याचे अपीलकर्त्याने सांगितल्यामुळे तसे कळविले व इतर माहिती दिली, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शहर उप अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. एन.एस.सरनोबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शहर उप अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. एम.एम.निर्मळे यांनी नमूद केले. श्री. गाडेकर यांनी उपलोकायुक्तांसह या संदर्भात विविध अधिकाऱ्यांकडे अर्ज केले असून वेळोवेळी त्याबाबतची माहिती देण्यात आली व आवश्यक प्रशासकीय कार्यवाहीही करण्यात आली. संबंधित प्रकरण फेरविचारार्थ घेऊन भाडेकरूंची जागा सोडून सुधारित आराखड्यास मंजुरी देण्यात आली, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री. जी.एन.देशमुख यांनी केले.

अपीलकर्त्यास संबंधित तक्रारीबाबत आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीची माहिती याच दिवशी द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री. गाडेकर यांना सुनावणीच्या दिवशीच माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा शहर उप अभियंता, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.एन. एस. सरनोबत यांनी आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

### <u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ११.२.२०१०

मुद्दे असेही पुढे श्री. कोरे यांनी उपस्थित केले असून त्याबाबत स्वतंत्र न्यायालयाकडे तक्रार करण्याचा मार्ग त्यांना मोकळा आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १३ [illegible]

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. सिध्दार्थ महादेव कांबळे
मु. वडापूर , पो. कुसूर,
ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**जन माहिती अधिकारी तथा**
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर

**उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ११४०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२९.७.२००८ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** वडापूर वि. का. से. सहकारी सोसायटी सभासद, जमाखर्च, कर्ज इत्यादी माहिती. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. सिध्दार्थ महादेव कांबळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र ब, तसेच जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात योणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२२.१.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. ॲड. खतीब वकील
असोसिएशन ऑफ ॲडव्होकेट प्रॅक्टिसिंग
बिफोर द चॅरिटी कमिशनर ऑफ महाराष्ट्र,
१३०/१६, सोलापूर, झेड पी. पी. ओ. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१२.२००५ |
| ४ | प्रथमअपिलाची तारीख | दि.२०.१.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.२.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** सोलापूर येथील तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यांनी मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम १९५० च्या कलम २०, २२, २३, अ व ५० अ नुसार दि. १.४.२००३ ते ३१.३.२००४ या काळात दिलेल्या अंतिम निर्णयाच्या प्रती. | |

**विवेचन**

सोलापूर येथील तात्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यानी दिलेल्या अंतिम निर्णयाची तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून मिळाली नाही. व अपिलीस प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी

अपिलाची योग्य प्रकारे दखल न घेता अपिले फेटाळली, या कारणावरून अपिलकर्ता श्री. खतीब वकील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आपण दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय व्हावा, उपस्थितीची आवश्यकता नसल्याचे अपीलकर्ता श्री. खतीब वकील यांनी दि. २१.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

अपीलकर्ता श्री. खतीब वकील यांनी अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत, तसेच त्यांच्या यापुर्वी दाखल केलेल्या अपील क्र ८३ ते ८७/सोलापूर या अपीलातील विषय व हया अपिलातील विषय एकच असल्याने सदर अपिल प्रकरणी यापुर्वी दि. २४.८.२००९ रोजी आयोगाने दिलेले आदेश याही अपिलाला लागू होतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२५.१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे - ४११ ००१

श्री. एम. एच. खोत — **अपीलकर्ता**
मु.पो.कणसेवाडी, ता.खटाव, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक अभियंता व प्रशासक, — **उत्तरवादी**
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे-४११ ००१
**जन माहिती अधिकारी तथा** उपविभागीय अभियंता, दुष्काळी भाग,
लघु पाटबंधारे (सर्वेक्षण), उप विभाग क्र.१, वडुज, ता.खटाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१२३२/२००९ / सातारा** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | **दि. २१/४/२००९** |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | **दि. १९/६/२००९** |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | **दि. १३/८/२००९** |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** मौजे कणसेवाडी, ता.खटाव येथील पाझर तलाव दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक, मंजूरी आदेश, वर्क ऑर्डर, मंजूरी पत्रक, खर्चाची बीले, व्हावचर व तदनुषंगिक ५ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. एम.एच. खोत यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपीलाच्या अनुषंगाने त्यांना आवश्यक ती माहिती देण्यात आलेली असून, त्यांच्या माहिती मागणी अर्जानुसार त्यांना माहिती प्राप्त झाली असल्याबाबतची अपीलकर्ता श्री. खोत यांची दिनांक १५/९/२००९ रोजीची पोहोच उपकार्यकारी अभियंता, कन्हेर विकास विभाग, सातारा यांनी दिनांक १९/९/२००९ च्या पत्रासोबत आयोगास सादर केली आहे.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

**<u>आदेश</u>**

अपील  निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २७ -०१-२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. महादेव विठोबा माळी
मु.पो. घोसरवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर — **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधीक्षक भूमी अभिलेख,
कोल्हापूर — **उत्तरवादी**
**जन माहिती अधिकारी तथा** तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख शिरोळ, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **१२७/२०१०/ कोल्हापूर** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९-२-२००९ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७-३-२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २४-३--२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०-४-२००९ |
| ३ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u> :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) ची छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. महादेव विठोबा माळी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत आवश्यक शुल्क (रुपये २०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणे:-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २५-१-२०१०

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. पुष्कर श्रीवास्तव
चेअरमन, ऑक्सफर्ड व्हिलेज कम्फर्ट,
कन्डोमिनियम ऑफ अपार्टमेंट,
सर्व्हे नं.६१/६२/६३, वानवडी, पुणे-४० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा** विकास अभियंता (बां.नि.),
पुणे महानगरपालिका, पुणे **उत्तरवादी**

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.३.२००७, २९.४.२००८ व ४.२.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.६.२००७ |
| ४ | माहिती -मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. पुष्कर श्रीवास्तव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतूदी पहाता मुदतबाह्य आहे. शिवाय त्यांनी आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जासाठी एकत्रित अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती-मागणीसाठी अर्ज करणारा अर्जदार व आयोगाकडील अपीलकर्ता या

वेगवेगळ्या व्यक्ती आहेत. या सर्व बाबी लक्षात घेता श्री.श्रीवास्तव यांच्या अपिलांवर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : ३०/०१/२०१०**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री.परमेश्वर दत्तात्रय तळेकर
मु. पो. केम, ता. करमाळा,जि. सोलापूर **अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, करमाळा, जि. सोलापूर **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत केम, ता करमाळा, जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२९५/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.५.२००८ |
| ३ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.९.२००८ |
| ४ | प्रथमअपिलाची तारीख | दि.७.७.२००८ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.६.९.२००८ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** १२ वा वित्त आयोग कामे व खर्च, संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेमधून केलेली कामे, दलित वस्ती सुधार योजणे मधील कामे व इतर एकूण ९ मुद्यांची माहिती. | |

**विवेचन**

राज्य माहिती आयोगाने दि. २७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता.

आवश्यक माहिती अपीलकर्त्यास दिल्याचे जन माहिती अधिकारी /अपिलीय प्राधिकारी यांनी 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात अपिलकर्त्याच्या पोहोचसह नमूद केले. तसेच अपीलकर्ता श्री. तळेकर यांना दिलेल्या माहितीची प्रत दि. १५.१.२००९ रोजीच्या निवेदनाव्दारे आयोगास सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२५.१.२०१०**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. ॲड. खतीब वकील
असोसिएशन ऑफ ॲडव्होकेट प्रॅक्टिसिंग
बिफोर द चॅरिटी कमिशनर ऑफ महाराष्ट्र,
१३०/१६, सोलापूर, झेड पी. पी. ओ. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१२.२००५ |
| ४ | प्रथमअपिलाची तारीख | दि.२०.१.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.२.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** सोलापूर येथील तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यांनी मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम,१९५० च्या कलम २०, २२, २३, अ व ५० अ नुसार दि. १.४.२००४ ते ३१.३.२००५ या काळात दिलेल्या अंतिम निर्णयांच्या प्रती. | |

## विवेचन

सोलापूर येथील तात्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यानी दिलेल्या अंतिम निर्णयांची तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून मिळाली नाही. व अपिलीस प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी

अपिलाची योग्य प्रकारे दखल न घेता अपिले फेटाळली, या कारणावरून अपिलकर्ता श्री. खतीब वकील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आपण दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय व्हावा, उपस्थितीची आवश्यकता नसल्याचे अपीलकर्ता श्री. खतीब वकील यांनी दि. २१.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

अपीलकर्ता श्री. खतीब वकील यांनी अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत, तसेच त्यांनी यापुर्वी दाखल केलेल्या अपील क्र ८३ ते ८७/सोलापूर या अपीलातील विषय व हया अपिलातील विषय एकच असल्याने सदर अपिल प्रकरणी यापूर्वी दि. २४.८.२००९ रोजी आयोगाने दिलेले आदेश याही अपिलाला लागू आहेत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२५.१.२०१०**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. धनंजय भगवानदास देवी
प्लॉट नं.२३, ओंकार, रांगोळे कॉलनी,
गेंडामाळ, सातारा
अपीलकर्ता

**विरुध्द**

१. **अपिलीय प्राधिकारी** तथा सह सचीव (उच्च शिक्षण),
रयत शिक्षण संस्था, सातारा
उत्तरवादी

२. **अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा

३. **अपिलीय प्राधिकारी** तथा कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

१. **जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन
महाविद्यालय, सातारा, जि. सातारा

२ **जन माहिती अधिकारी** तथा संचालक, महाविद्यालय व
विद्यालय विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३० + १३१ + १८० + २३७ + २७५ + २७६ + २७२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १०.१२.२००८ |

३ उपस्थित

**अपीलकर्ता** - प्रा. धनंजय भगवानदास देवी
प्लॉट नं.२३, ओंकार, रांगोळे कॉलनी,
गेंडामाळ, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह सचीव (उच्च शिक्षण),
रयत शिक्षण संस्था, सातारा प्रतिनिधी डॉ. बी. एल. पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा संचालक, महाविद्यालय व
विद्यालय विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रतिनिधी
श्री. बी. एम. हिर्डेकर

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| १३० / सातारा | १०.८.२००६ | १४.९.२००६ | २६.९.२००६ | १६.११.२००६ |
| १३१ / सातारा | २७.९.२००६ | १९.१०.२००६ | २०.१०.२००६ | १७.११.२००६ |
| १८०/ सातारा | २५.४.२००६ | २५.८.२००५ | ११४.९.२००६ | १५.४.२००६ |
| २३७/ सातारा | २२.६.२००७ | १९.७.२००७ | ८.८.२००७ | २३.११.२००७ |
| २७५/ सातारा | २३.७.२००७ | २३.११.२००७ | --- | -- |
| २७६/ सातारा | २२.६.२००७ | -- | २७.८.२००७ | १.१२.२००७ |
| २७२/ सातारा | १.७.२००७ | ६.८.२००७ | ७.८.२००७ | ७.९.२००७ |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाच्या (जोडपत्र-अ) छायाप्रती सोबत जोडल्या आहेत.

## विवेचन

आयोगाने दि. १५.५.२००८ व दि. २१.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. उभय बाजूंमध्ये एकमत न झाल्याने दि. १०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्या कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयाच्या संदर्भात माहिती मागणारे विविध अर्ज केल्यानंतर त्यानुसार विहित मुदतीत योग्य

व परिपूर्ण माहिती देण्यात आली नाही. संस्थेचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी माहिती देऊ इच्छित नाहीत. संस्थेच्या हितासाठी व भ्रष्टाचार उघड होण्यासाठी आपल्याला माहिती मिळणे आवश्यक असून ती न दिल्याबदल संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता प्रा. धनंजय भगवानदास देवी यांनी केली.

प्रा. देवी यांना वेळोवेळी सर्व माहिती देण्यात आली आहे. पुनःपुन्हा तीच माहिती मागणारे अर्ज व त्याच स्वरुपाच्या तक्रारी ते करीत असतात. मूळ अर्जापेक्षा वेगळी माहिती ते अपिलात मागतात. सर्व कागदपत्रे त्यांना दाखविण्याची तयारी दर्शविल्यानंतरही नवनवे मुद्दे उपस्थित करणारा पत्रव्यवहार ते करीत राहतात, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालय, सातारा, यांचे प्रतिनिधी डॉ. बी. एल. पाटील, जन माहिती अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यालय विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर श्री. बी. एम. हिर्डेकर, अपिलीय प्राधिकारी तथा सह सचीव (उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था, सातारा डॉ. बी. एल. पाटील, अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी लेखी / तोंडी केले.

उभय बाजूंनी पुढीलप्रमाणे निवेदन केले :

अपीलकर्ता प्रा. धनंजय भगवानदास देवी : धर्मादाय आयुक्तांनी आदेश देऊनही रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयाबाबतची माहिती संस्थेने दिली नाही. त्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालय, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा सह सचीव, (उच्च शिक्षण), रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्यावर कारवाई करावी.

अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सातारा श्री. पी. बी. तिजारे : महाविद्यालयाच्या प्राचार्यासंबंधीची माहिती प्रा. देवी यांनी मागितली होती. सहाय्यक धर्मादाय आयुक्त कार्यालयाच्या कक्षेतील ही माहिती नाही. त्यामुळे प्रा. देवी यांनी वेळोवेळी केलेले अर्ज सचीव, रयत शिक्षण संस्था, सातारा यांच्याकडे वर्ग करुन माहिती देण्याबाबत त्यांना कळविले. प्रा. देवी यांनी अपुरी माहिती मिळाल्याची तक्रार अपिलात केली.

तथापि मूळ अर्जानुसार माहिती देण्यात आली आहे. अपिलात अतिरिक्त माहिती मागितली असून त्या संदर्भात स्वतंत्र अर्ज केल्यास दिली जाईल, असे सचीव, रयत शिक्षण संस्था यांनी कळविले. संस्थेसंबंधीची माहिती हवी असल्यास अपीलकर्त्यांनी संस्थेच्या जन माहिती अधिकाऱ्यांकडे अर्ज करावा, असा निर्णय देऊन माहिती देण्याबाबत संस्थेलाही कळविले. माहितीबाबत अपीलकर्त्यांची तक्रार असल्यास ती संस्थेची जबाबदारी आहे.

श्री. देवी यांनी विविध पातळयांवर अर्ज केले असून धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे मागितलेली माहिती न दिल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांना जबाबदार धरण्याची मागणी केली आहे. धर्मादाय आयुक्त कार्यालयाशी संबंधित नसलेला असा हा विषय असून या कार्यालयाने आवश्यक ती कार्यवाही केली आहे. तसेच त्या अनुषंगाने मूळ अर्जानुसार माहिती संस्थेने दिली आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालय, सातारा यांचे प्रतिनिधी डॉ. बी. एल. पाटील : प्रा. देवी यांनी मागितलेली माहिती देण्यात आली असून सह धर्मादाय आयुक्त, सातारा यांच्याकडेही सादर केली आहे.

**अपील क्र.२७२ / सातारा**

अपीलकर्ता प्रा. धनंजय भगवानदास देवी : कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. व्ही. बारबडेकर हे मान्यताप्राप्त प्राध्यापक नसल्यामुळे त्यांच्यावर केलेल्या कारवाईची माहिती दिली नाही. तसेच आदर्श आचारसंहिता असूनही त्याची माहिती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी सुनावणी न घेता निर्णय दिला.

जन माहिती अधिकारी तथा संचालक, महाविद्यालय व विद्यालय विकास मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर श्री. बी. एम. हिर्डेकर : प्रा. देवी यांच्या मूळ अर्जानुसार संपूर्ण माहिती देण्यात आली आहे. एवढेच नव्हे, तर मूळ अर्जातील उत्तरानंतर अपिलाच्या वेळी त्यांनी अतिरिक्त माहितीची मागणी केली, तीही त्यांना देण्यात आली. अपिलाची सुनावणी न घेता निर्णय दिला आहे. हे प्रा. देवी यांचे म्हणणे चुकीचे आहे. त्याना अनेकदा प्रत्यक्ष भेटीसाठी बोलावून चर्चा करून

विद्यापीठातर्फे सर्व माहिती, छायांकित प्रती देण्यात आल्या. संस्थेतील नेमणुकीच्या संदर्भात एखाद्या व्यक्तीने नियमबाहय वर्तन केले असल्यास त्याबाबतची कारवाई रयत शिक्षण संस्थेने करावी लागेल.

**अपील क्र. १३० + १३१ / सातारा**

अपीलकर्ता प्रा. धनंजय भगवानदास देवी : 'पॅनोरमा' या संस्थेच्या नियतकालिकासंबंधातील संपादकांचे काम थांबविणे, जाहिरातीसाठी संपादकांनी केलेला खर्च व नियतकालिक वेळेत प्रसिध्द न होणे याबाबतची योग्य माहिती दिली नाही. नियतकालिक निघण्यास झालेल्या विलंबाबाबत संबंधितांवर कारवाई का केली नाही, याचाही खुलासा केलेला नाही.

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालय, सातारा यांचे प्रतिनिधी डॉ. बी. एल. पाटील : छपाईतील अडचणीमुळे नियतकालिकाचा अंक प्रसिध्द होण्यास उशीर झाला. संपादक म्हणून काम पाहणाऱ्या शिक्षक-प्राध्यापकांनी त्या संदर्भात सविस्तर पत्र दिलेले आहे. उशिराबद्दल त्यांच्यावर कारवाई करता येणार नाही, यासह सर्व माहिती प्रा. देवी यांना देण्यात आली आहे. मूळ अर्जाव्यतिरिक्त जादा व विस्तृत माहिती त्यांनी प्रथम अपिलात मागितली, तीही त्यांना देण्यात आली. नसलेली माहिती देता येणार नाही, असे त्यांना कळविले असूनही ती न मिळाल्याची तक्रार ते करीत आहेत. प्रत्येक अर्जानंतर पूरक पत्रव्यवहार करुन व अपिलांमध्येही जादा माहितीची मागणी ते करतात, त्यामुळे नेमकेपणाने मागणीबाबत स्पष्टता राहत नाही व उत्तराबाबत ते वेगवेगळ्या स्वरुपाच्या तक्रारी करतात.

**अपील क्र. २३७ + २७६ / सातारा**

अपीलकर्ता प्रा. धनंजय भगवानदास देवी : कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य बारबडेकर यांची शैक्षणिक पात्रता नसताना त्यांना वरचे पद देण्यात आले. शिवाजी विद्यापीठाने त्याबाबत जाणीव देऊनही नियमबाह्य बाब लक्षात आणून दिल्यानंतर त्यांच्यावर कारवाई होणे आवश्यक होते. तशी कारवाई केली नाही व नेमकी माहिती दिली जात नाही. प्रॉव्हिडंट फंड, ग्रच्युईटी यांच्या रकमाही प्रा. बारबडेकर यांना संस्थेने दिल्या. ते आता

राजीनामा देऊन गेले असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करणे शक्य नाही, असे संस्थेचे सचीव म्हणतात. हा सार्वजनिक पैशाचा प्रश्न असल्यामुळे कायदेशीर कारवाई झाली पाहिजे.

जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, कर्मवीर भाऊराव पाटील अभियांत्रिकी व तंत्रनिकेतन महाविद्यालय, रयत शिक्षण संस्था, सातारा यांचे प्रतिनिधी डॉ. बी.एल. पाटील :

राजीनामा दिला असल्यामुळे कारवाई करता येणार नाही, असे म्हणणे चूक आहे, हे मान्य आहे. श्री. बारबडेकर यांची शैक्षणिक अर्हता, त्यांची नेमणूक आदींबाबत माहिती संकलित करुन त्यांच्यावर कारवाई करण्याची कार्यवाही संस्था करीत आहे. प्रॉव्हिडंट फंड आदी रकमा कायद्यानुसार रोखून धरता येणार नाहीत. त्यामुळे अदा करण्यात आल्या.

**अपील क्र. २७५ / सातारा**

अपीलकर्ता प्रा. धनंजय भगवानदास देवी : मुडदा पाडण्याची धमकी आपल्याला दिल्याबाबत आपण केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दिली नाही व संबंधितांवर योग्य कारवाई केली नाही. या संदर्भातील तक्रारीबाबतच्या प्राचार्यांच्या सविस्तर अहवालाची प्रत दिली नाही.

जन माहिती अधिकारी रयत शिक्षा संस्था, सातारा यांचे प्रतिनिधी डॉ. बी. एल. पाटील : मूळ अर्जानुसार सर्व मुद्दयांची माहिती प्रा. देवी यांना दिली आहे. कोणताही सविस्तर अहवाल प्राचार्यांनी दिला नव्हता, त्यामुळे कारवाईचा प्रश्न येत नाही.

**निष्कर्ष :**

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता प्रा. देवी यांनी विस्तृत स्वरुपात अर्ज व पत्रव्यवहार केल्याचे दिसते. तसेच मूळ अर्जापेक्षा वेगळी माहिती अपिलांमध्ये मागितली असून अनेक बाबतीत प्रशासकीय कार्यवाहीची मागणी केली आहे. या दोन्ही बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत योग्य ठरत नाहीत. अर्ज, अपिले व पत्रव्यवहार यांची सरमिसळ केल्यामुळे उत्तरे व माहिती यांच्या तपासणीबाबत नेमकेपणा राहत नाही. मात्र संस्थेनेही माहिती देण्याबाबत पूर्णतः पारदर्शकतेची भूमिका घेतलेली दिसत नाही. संस्थेकडील सर्व अपिलांचा एकत्रित विचार व पूर्तता करण्याचे उभय बाजूंनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या

वेळी ठरवले होते. त्यानुसार कार्यवाही झाली नसल्याची तक्रार प्रा. देवी यांनी दि. २९.१२.२००८, दि. ३.१.२००९ व दि. १३.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली आहे. त्याबाबत संस्थेने खुलासा करणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

२. अपीलकर्ता प्रा. धनंजय भगवानदास देवी यांच्या रयत शिक्षण संस्थेकडील उपरोक्त अपिलांमधील सर्व अपिलांबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल रयत शिक्षण संस्थेचे सचीव यांनी दि. ३०.१.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि. १३ .१.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.भिकाजी सखाराम लोंढे
हरिश्चंद्र सायकल मार्ट,
अहमदनगर-पुणे रोड, पाबळ फाटा,
घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे ४१२ २१० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
वाडीया कॉलेज चौक, ढोले-पाटील रोड,
पुणे ४११ ००१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी**
**गुरुवर्य** मच्छिंद्रनाथ अध्यात्मिक सेवा प्रतिष्ठान
नाथनगर, शिरुर (रामलिंग), ता.शिरुर,
जि.पुणे ४१२ २१०

| अ.क्र. | अपील क्र. | जन माहिती अधिकारीऱ्याकडे अर्ज केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | अपिलीय प्राधिकारी यांच्या निर्णयाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २६६/पुणे | २५.७.२००६ | - | ५.९.२००६ | - |
| २ | २९५/पुणे | १८.५.२००६ | - | १९.७.२००६ | - |
| ३ | ६७५/पुणे | १.१२.२००६ | - | १८.१.२००७ | - |
| ४ | ७२१/पुणे | १५.१२.२००६ | - | २३.२.२००७ | - |
| ५ | १२९४/पुणे | ८.१.२००७ | - | ९.३.२००७ | - |
| ६ | १२९६/पुणे | १५.१.२००७ | - | १३.३.२००७ | - |
| ७ | १३४०/पुणे | २६.३.२००७ | - | १७.५.२००७ | - |
| ८ | १३४१/पुणे | ३.४.२००७ | - | १७.५.२००७ | - |

## <u>विवेचन</u>

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यास) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते, याचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री.भिकाजी सखाराम लोंढे यांनी दिलेले नाहीत. त्यामुळे सदरची अपिले दाखलयोग्य ठरत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## <u>आदेश</u>

वरील आठ अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक : २२/०१/२०१०**

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री. दिगंबर शंकर गिरमे
४२२, कसबा पेठ,
पुणे-११

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-१, पुणे शहर, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** सहाय्यक पोलीस उप आयुक्त,
फरासखाना पोलीस स्टेशन इमारत, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३८०/पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रमाची तारीख | दि.२७.०५.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०८.११.२००५ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१२.०१.२००६ |
| ५ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दिगंबर शंकर गिरमे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाचा समावेश दि.२७.०५.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'मध्ये होता. सदर कार्यक्रमातील प्रपत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध अर्ज दाखविले असल्याचे नमूद केले आहे. सदर अपिलासोबतची कागदपत्रे पाहता सहाय्यक पोलीस आयुक्त, विश्रामबाग पोलीस स्टेशन यांचे दि.१२.१२.२००७ रोजीचे पत्र व अपीलकर्त्याचा दि.३०.०१.२००६ रोजीचा जबाब पाहता अपीलकर्त्यास मूळ माहिती अर्जाप्रमाणे दाखविल्याचे दिसते. तसेच माहिती

लेखी व तोंडी दिल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस उप आयुक्त, फरासखाना पोलीस स्टेशन इमारत, पुणे यांनी लेखी निवेदनाद्वारे तसे नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुंवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २५/०१/२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११००१

श्री. ॲड. खतीब वकील
असोसिएशन ऑफ ॲडव्होकेट प्रॅक्टिसिंग
बिफोर द चॅरिटी कमिशनर ऑफ महाराष्ट्र,
१३०/१६, सोलापूर, झेड पी. पी. ओ. सोलापूर

**अपीलकर्ता**

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा**
सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा**
अधीक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नाथ प्राईड, उत्तर सदर बझार, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१२.१२.२००५ |
| ४ | प्रथमअपिलाची तारीख | दि.२०.१.२००६ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१९.२.२००६ |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-</u>** सोलापूर येथील तत्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यांनी मुंबई सार्वजनिक न्यास अधिनियम,१९५० च्या कलम २०, २२, २३, अ व ५० अ नुसार दि. १.४.२००५ ते २५.५.२००५ या काळात दिलेल्या अंतिम निर्णयाच्या प्रती. | |

**<u>विवेचन</u>**

सोलापूर येथील तात्कालीन सहाय्यक धर्मादाय आयुक्त श्री. वाय. जी. बोराडे यानी दिलेल्या अंतिम निर्णयाची तपशीलवार माहिती जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सोलापूर यांच्याकडून मिळाली नाही. व अपिलीस प्राधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांनी

अपिलाची योग्य प्रकारे दखल न घेता अपिले फेटाळली, या कारणावरून अपिलकर्ता श्री. खतीब वकील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आपण दाखल केलेल्या कागदपत्रांच्या आधारे गुणवत्तेवर निर्णय व्हावा, उपस्थितीची आवश्यकता नसल्याचे अपीलकर्ता श्री. खतीब वकील यांनी दि. २१.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

अपीलकर्ता श्री. खतीब वकील यांनी अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत, तसेच त्यांनी यापुर्वी दाखल केलेल्या अपील क्र ८३ ते ८७/सोलापूर या अपीलातील विषय व हया अपिलातील विषय एकच असल्याने सदर अपिलांमध्ये यापुर्वी दि. २४.८.२००९ रोजी आयोगाने दिलेले आदेश याही अपिलाला लागू होतील.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२५.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.सुधीर माधव जोशी
द्वारा श्री.वाय.वाय.साबणे
५८७, दत्तप्रसाद सोसायटी,
पुणे सिंहगड रस्ता, पुणे४११ ०३० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.),
पुणे महानगरपालिका, पुणे -५ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सह आयुक्त (जिं.घ),
पुणे महानगरपालिका, पुणे -५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४६ / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.१२.०६.२००८ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०८.०९.२००६ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२२.०९.२००६ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१८.०९.२००६ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- — |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

सांख्यिकी व संगणक प्रमुख यांच्याकडून उपलब्ध करण्यात आलेली माहितीची कागदपत्रे आवश्यक त्या फी चे प्रदान करुन प्राप्त करुन घेणेबाबत अपीलकर्ता श्री.सुधीर माधव जोशी यांना दि.३०.०९.२००६ च्या पत्राने कळविले होते. त्यानुसार श्री. जोशी यांचेकडून दि.१६.१०.२००६ रोजी मनिऑर्डरद्वारे प्राप्त झाल्यानंतर माहितीची कागदपत्रे त्यांनी दिलेल्या पत्त्यावर टपालाद्वारे पाठविण्यात

आली, असे जन माहिती अधिकारी तथा सह आयुक्त (जिं.घ.), पुणे महानगरपालिका, पुणे-५ यांनी त्यांचे पत्र जा.क्र.सहमआ/१००५,दि.१३.११.२००७ अन्वये आयोगास अवगत केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : २० /०१/२०१०**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**